Maha.Times Dt. 30/12/2022

# शेतमालाचे करणार मार्केटिंग

## कृषी विभागाचा पुढाकार; लवकरच स्वतंत्र धोरण जाहीर होणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शेतमालाला योग्य भाव मिळाला तर, शेतकऱ्यांच्या कष्टांचे चीज होते. मात्र, अनेकदा शेतकऱ्यांना पिकांचे योग्य 'मार्केटिंग' जमतेच असे नाही. या पार्श्वभूमीवर राज्याच्या कृषी विभागाने शेतमालाचे मार्केटिंग करण्यासाठी खात्यातीलच काही कर्मचाऱ्यांची मदत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कृषी विभाग लवकरच स्वतंत्र धोरण जाहीर करणार आहे.

शेतकरी शेतमाल पिकवितो आणि बाजारसमितीत विक्रीसाठी आणतो. काही वस्तू आता नियमनमुक्त झाल्या आहेत. त्यामुळे बाजार समितीत आडत्यांमार्फत शेतमाल विकण्याची गरज नाही. त्या वस्तू अथवा शेतमाल थेट बाजाराबाहेर विकता येणार आहेत. त्यासाठी 'मार्केटिंग'ची गरज आहे. कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांनीही शेतकऱ्यांना शेतमालाला चांगला दर मिळावा यासाठी 'मार्केटिंग'चे धोरण राबविण्याची गरज व्यक्त केली आहे.

### कर्मचारी साधणार समन्वय

शेतमालाचे योग्य पद्धतीने 'मार्केटिंग' करणे गरजेचे आहे. राज्यातील अनेक शहरांलगत शेतीचे प्रमाण कमी होत आहे. दुसरीकडे, कृषी विभागातील कर्मचारी खात्याच्या दृष्टीने अतिरिक्त ठरत आहेत. मात्र, त्यांना अतिरिक्त न ठरविता वेगळी जबाबदारी देण्याचा कृषी विभागाचा मानस आहे. या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून मार्केटिंगची साखळी तयार केली जाणार आहे. राज्यात सुमारे ५० तालुके शहरांलगत आहेत. कृषी विभागाने नव्याने सादर केलेल्या आकृतिबंधाला अजून मान्यता मिळालेली नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांना पुरेसे काम नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांची शेतमालाच्या मार्केटिंगसाठी मदत घेण्याचे कृषी आयुक्तांनी ठरवले आहे. त्यासाठी कृषी विभागाचे कर्मचारी समन्वयकाची भूमिका बजावणार आहेत.

### बचत गटांचीही घेणार मदत

पुण्यासारख्या मोठ्या महापालिका; तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांशेजारी शेतमाल विक्रीच्या व्यवस्थेचा शोध कृषी विभागाचे कर्मचारी घेतील. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून नव्या जागेचा शोध घेऊन व्यापारी संस्था, मॉलसोबत करार करण्याचे उपक्रम राबविले जातील. त्यामुळे शेतमालाचे मार्केटिंग करणे सोपे होणार आहे. याबाबत बचत गटांशी चर्चा करून त्यांना सुविधा पुरविण्याचा विचार आहे. आठवडे बाजारासारखे उपक्रम अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी अयशस्वी ठरले. कृषी विभागाकडे शहरांलगतच्या किमान ५० तालुक्यांमधील कर्मचाऱ्यांकडे काम नसल्याने त्यांना या कामासाठी वळवले जाणार आहे.




"राज्यातील शेतमालाचे मार्केटिंग करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्या आहेत. शेतमालाच्या विक्रीसाठी सहज शक्य असलेल्या काही बाबी अंमलात आणल्यास शेतकऱ्यांना फायदा होईल.

\- सुनील चव्हाण,
कृषी आयुक्त

पुढारी

# 'स्मार्ट' अंतर्गत सुविधांतून निर्यातवृद्धीचे प्रयत्न

पुणे : पुढारी वृत्तसेवा

शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यामध्ये कृषी माल निर्यातीच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची जबाबदारी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळावर देण्यात आली आहे.

त्यांच्याकडून तयार करण्यात येणाऱ्या अहवालावर आधारित प्रस्तावित प्रकल्पाद्वारे निर्यात वृद्धीसाठी कोणत्या प्रकारच्या पायाभूत सुविधांची उभारणी आवश्यक आहे, ते ठरविण्यात येणार आहे.राज्यात फळे व भाजीपाल्याच्या वाढीसाठी कोणकोणत्या पायाभूत सुविधांची गरज आहे व या सुविधा राज्यामध्ये कुठे असाव्यात, या अनुषंगाने जागतिक बँकेच्या सल्ल्याने हे कामकाज पणन मंडळाकडे देण्यात आले आहे. जागतिक व्यापार संघटनेची प्रमाणके व व्यापार विकास सुविधांमार्फत निर्यातवाढीसाठीच्या पायाभूत सुविधांबाबतचा आढावा घेण्यासाठी अभ्यास अहवाल पणन मंडळ तयार करणार आहे. त्यानंतर प्रकल्पाद्वारे उचित सेवा पुरवठादाराची नेमणूक करून आवश्यक सुविधांची उभारणी व संचलन करण्याचे नियोजित असल्याचे पणन मंडळातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

> "जागतिक बँकेच्या सहकार्याने व्यापार संघटनेमार्फत विकसित तंत्रज्ञानाचा वापर करून तंत्रशुध्द पध्दतीने करण्यात येणारा अभ्यास अहवाल महत्त्वाचा आहे. त्याआधारे राज्यात कृषी माल निर्यातीभिमुख सोईसुविधा उभ्या झाल्यास शेतकऱ्यांच्या मालाच्या निर्यातीकरिता त्याचा फायदा होईल. ज्यामुळे निव्वळ उत्पन्न वाढीस मदत होईल.
>
> **- दीपक शिंदे,**
> कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ.

**राज्य कृषी पणन मंडळावर यंत्रणेची जबाबदारी**

कृषी माल उत्पादनांचे जागतिकीकरण, त्याचा पुरवठा, त्याची मूल्यसाखळी यामध्ये कृषी मालाची सुरक्षितता व गुणवत्ता टिकून राहणे गरजेचे असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील मागणीनुसार गुणवत्तापूर्ण मालाचा पुरवठा करायचा असल्यास त्या त्या देशांमधील विविध मानके व उच्च प्रतिच्या गुणवत्तेसाठी प्रमाणिकरण करून देणे आवश्यक असते. सुगीपश्चात व्यवस्थापन मालाची तपासणी व प्रमाणिकरणाची खात्री देण्याकरिता केंद्रस्तरावर अपेडा संस्था, तर राज्यस्तरावर पणन मंडळाचा सक्रिय सहभाग आहे.

# शेतकऱ्यांच्या घरातच सुरु होतील ऑनलाइन बाजार




**कृषिचिंतन**
सुनील पवार
९५४५५५२८८०


**नाशिक जिल्ह्यातील कळवणच्या मानूर येथील शेतकरी कुटुंबातील सुनील पवार यांनी अन्न अभियांत्रिकीमध्ये बी-टेक, एम-टेकपर्यंत शिक्षण घेतले. भारतीय कृषी संशोधन परिषदेत (आसीएआर) काही काळ सेवा करीत ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेद्वारे जिल्हा उपनिबंधक बनले. राज्याचे सहकार आयुक्त, पणन संचालक अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडताना सहकार खात्यातील अभ्यासू अधिकारी म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. निवृत्तीनंतरदेखील ते विविध कृषी उपक्रमांसाठी सल्ला सेवा देत आहेत.**

कृषी क्षेत्रात केवळ उत्पादन केंद्रीत धोरणं, योजना किंवा नियोजनाला प्रथम प्राधान्य दिले जाते. विपणन अजुनही दुय्यम आहे. पण, येथेच चुकते आहे. मला असे वाटते की, उत्पादनाइतकेच महत्व आधीपासूनच शेतीमाल पणन नियोजनाला द्यायला हवे. उत्पादन आणि पणन या दोन्ही प्रक्रिया समांतर चालू असतात. त्या परस्परपूरक असून नियोजनासाठी दोन्ही व्यवस्थांना सारखेच जपायला हवे. अर्थात, तसे होत नाही. त्यामुळेच तर अनेक समस्या उद्भवत आहेत. भविष्यातील शेतीच्या नियोजनात हा गोंधळ मिटवला जाण्याची शक्यता जास्त आहे. राज्यापुरते बोलायचे झाल्यास सव्वा कोटींपेक्षा जास्त शेतकरी खातेदार आहेत. त्यांच्यावर अंदाजे ६-७ कोटी लोकसंख्या अवलंबून आहे. देशापुरते बोलायचे झाल्यास केवळ कृषी, गौणउपज, मत्स व्यवसायापासून २० लाख कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. आपण ३०५ दशलक्ष टन अन्नधान्य, ३३० दशलक्ष टन फलोत्पादन आणि २०० दशलक्ष टन दुग्धोत्पादनापर्यंत पोचलो आहोत. दुर्दैवाने उत्पादन वाढूनदेखील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले नाही. असे का झाले, तर त्याचे उत्तर उत्पादनाप्रमाणे आपली व्यवस्था विपणानावर केंद्रीत न झाल्याचा हा परिणाम आहे. त्यामुळे देशाच्या कृषीधोरणात यापुढे विपणन, प्रक्रिया या मुद्द्यांना खूप महत्व येईल.

देशातील शेतकऱ्यांचे अतिरिक्त विपणन (सरप्लस सेलिंग) प्रमाण वाढविण्यासाठी गोदाम साखळीच्या उभारणीला केंद्रस्थान मिळेल. फलोत्पादनात बाजार, प्रक्रिया आणि निर्यात या तीनही साखळ्या पुढे मजबूत होत जातील. सेंद्रिय शेतीमालाची बाजारपेठ विस्तारेल. विशेष म्हणजे अन्नधान्य असो की कृषी क्षेत्राशी संलग्न असलेले कोणतेही उत्पादन त्यातील घटक पदार्थ व उपयुक्तता या मुल्यांवर बाजारात खपेल. या उत्पादनातील उपयुक्त औषधी तत्वे किंवा पौष्टिक मूल्ये किती आहेत हे ग्राहकांना सांगितले जाईल. त्याआधारे या मालाचे ब्रॅण्डिंग किंवा विक्री करण्याचा प्रयत्न केला जाईल. सर्वात महत्वाचा बदल, माझ्या मते बाजार व्यवस्थेच्या पारंपरिक रचनांवर येईल. शेतीमाल पिकवला की जसा आहे तसाच विक्रीला बाजार समितीत नेण्याची पद्धत बदलेल. मुळात, पुढील काही वर्षांनंतर बाजार समितीत शेतकरी जाणारच नाहीत; तर समितीच्या यंत्रणा गावोगाव फिरून शेतीमालाचे संकलन करतील. तसेच, शेतकरी स्वतः ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून आपापल्या घरात शेतीमालाचे सौदे करतील.

राज्यात सध्या कापूस, सोयाबीन व पपईचे भाव शेतकरी स्वतः ठरवतात व त्या भावानुसार खरेदीसाठी व्यापारी आला तरच माल देतात. हीच पद्धत इतर शेतीमालासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर शेतकरी वापरतील. या ऑनलाइन प्रणालीशी मग सरकारच्या विविध योजना, कृषी पतपुरवठा, कृषी खात्याच्या संबंधित शेतकऱ्यांच्या वैयक्तिक योजना, पीकविमा, शेतीमाल वाहतूक, तारण, प्रक्रिया अशा विविध प्रणालीदेखील जोडलेल्या असतील. म्हणजेच यंदा खरिपात काढलेला माल विकायचा की गोदामात ठेवायचा, निर्यात करायचा की प्रक्रियेसाठी राखीव ठेवायचा, असे सर्व निर्णय शेतकरी स्वतः घेतील. यात अडचणी येतील तसेच ही पद्धत काही रातोरात विकसीत होणार नाही. मात्र, शेतकऱ्यांची बाजारव्यवस्था त्यादिशेने निश्चित वाटचाल करेल, असे मला वाटते. शेतकऱ्यांना सध्या बाजार व्यवस्थेत येण्यासाठी खूप अडचणी आहेत. गोदामाची जागा आणि पैश्यांची निकड अशा दोन बाबी पाहूनच शेतीमालाच्या विक्रीचा निर्णय शेतकरी घेतो. उदाहरणार्थ, शेतकऱ्याने १०० पोते मका काढल्यानंतर त्यातील काही पोते काढून न ठेवता सर्व पोते विकली जातात. वाहतुकीला खर्च येतो तसेच घरात साठवायला जागा नाही, याकारणास्तव शेतकरी सर्व मका बाजारात विकून टाकतात. भविष्यात गोदाम व्यवस्था, त्याला जोडून तारण कर्ज व्यवस्था, प्रक्रिया, निर्यात अशी साखळी तयार होईल. आणखी एक महत्वाचा बदल होईल तो शेतकऱ्यांचे सामुहिक दर व्यवहार संघ आकाराला येतील. त्याला 'बार्गेनिंग काऊन्सिल' म्हणतात. विदेशात शेतकऱ्यांच्या अशा परिषदा असतात. बाजारातील मागणी, उत्पादन खर्च आणि नफा याचा विचार करीत या परिषदांकडून शेतीमालाचे दर ठरविले जातात व त्यानुसारच व्यवहार होतो. ही आदर्श व्यवस्था भविष्यात आपल्याकडे अवतरण्यास वाव आहे. अर्थात, काही वर्षे आपल्याला वाट पहावी लागेल.

(शब्दांकन : **मनोज कापडे** )

# निर्यातक्षम गुळाचे उत्पादन विषयावर कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर, ता.२२ (प्रतिनिधी)–

..................................

**कोल्हापूरी गुळाच्या उत्पादनास चालना मिळावी, गुळ व्यवसायाने पुन्हा उभारी घ्यावी, तसेच नवीन गुळवे तयार व्हावेत यासाठी नाबार्ड, प्रादेशिक ऊस आणि गुळ संशोधन केंद्र व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ व २८ डिसेंबर २०२२ रोजी दोन दिवसांची कार्यशाळा प्रात्यक्षिकासह आयोजित करण्यात आली आहे.**

कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे यांच्या हस्ते कृषी क्लिनिक आणि कृषी व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, मोरेवाडी (शांतीनिकेतन शाळेजवळ) कोल्हापूर येथे होणार आहे.कार्यशाळा मोफत असून, यामध्ये फक्त ३० प्रशिक्षणार्थींसाठी प्रवेश दिला जाणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील इच्छुक गुळ उत्पादकांनी दि. २३ डिसेंबर पर्यंत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय, श्री छत्रपती शाहू सहकारी गुळ खरेदी विक्री संघ इमारत, शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर येथे नोंदणी करावी, असे आवाहन नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक अशुतोष जाधव, ऊस व गुळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. विद्यासागर गेडाम व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ.सुभाष घुले यांनी केले आहे.

Agrowon Dt. 09/12/2022



पुणे : सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था आणि 'सारथी'मध्ये प्रशिक्षण करार करण्यात आला. या वेळी 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे आणि राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या वतीने डॉ. भास्कर पाटील यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी 'सारथी'च्या प्रकल्प संचालक रोहिणी भोसले, राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेचे व्यवस्थापक विश्वास जाधव उपस्थित होते.

# सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था आणि 'सारथी'मध्ये करार

## निर्यातक्षम उत्पादन ते निर्यातीचे मिळणार प्रशिक्षण

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : तरुण शेती क्षेत्राकडे आकर्षित होऊन, व्यावसायिक शेतीतून उद्योजक व्हावा, या उद्देशाने राष्ट्रीय काढणीपश्चात तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेद्वारे विविध अभ्यासक्रम शिकविले जातात. या अभ्यासक्रमाचा जास्तीत जास्त उपयोग शेतकऱ्यांच्या मुलांना व्हावा, यासाठी संस्थेच्या वतीने 'सारथी' सोबत सामंज्यस्य करार करण्यात आला आहे.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेचे (सारथी) व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे आणि राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या वतीने डॉ. भास्कर पाटील यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी सारथीच्या प्रकल्प संचालक रोहिणी भोसले, राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेचे व्यवस्थापक विश्वास जाधव उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या गटातील, समाजातील व्यक्तींना होणार आहे. 'सारथी'ने राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेस या संदर्भात कार्यारंभ आदेश दिला आहे. सुरुवातीस एकूण दहा प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता दिली आहे.

### अर्जासाठी लवकरच ऑनलाइन सुविधा

सामंजस्य करार ३ वर्षांसाठी असून यासाठी उमेदवाराची पात्रता, अटी व कागदपत्रे निश्चित करण्यात आली आहेत. प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. या अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, अर्ज करण्यासाठीची ऑनलाइन सुविधा लवकरच राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

फलोत्पादन उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणांतर्गत हरितगृह व्यवस्थापन, शेडनेट हाउस तंत्रज्ञान, रोपांची अभिवृद्धी व भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन, पीकनिहाय अभ्यासक्रम, गुलाब, जरबेरा, कार्नेशन, पीकनिहाय अभ्यासक्रम - रंगीत ढोबळी मिरची, चेरी टोमॅटो, काकडी तर फलोत्पादन व्यवस्थापन प्रशिक्षणांतर्गत लॅण्डस्केपिंग व्यवस्थापन, उतिसंवर्धन तंत्रज्ञान, फ्लॉवर अरेंजमेंट, ड्राय फ्लॉवर आदी कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

लोकमत

# मालमत्तेवरील म्युन्सिपल करामध्ये सूट मिळावी

## बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचा ठराव

लोकमत न्यूज नेटवर्क

**बार्शी :** कृषि उत्पन्न बाजार समितीच्या मालमत्तेवर स्थानिक प्राधिकरणाकडून आकारला जाणारा म्युन्सिपल कराच्या कायद्यामध्ये दुरूस्ती करून स्थानिक प्राधिकरणाकडून सर्व मालमत्तेवर आकारला जाणारा म्युन्सिपल करामध्ये सूट मिळावी, अशा मागणीचा ठराव बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने केला आहे. या मागणीकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रयत्न करणार करण्याचादेखील निर्णय घेण्यात आला.




या ठरावाविषयी संचालक रावसाहेब मनगिरे म्हणाले, बाजार समितीच्या आवारातील मालमत्तेवर बाजार समितीस कुठलीही सेवा न पुरविता स्थानिक प्राधिकरणाकडून लाखो रूपयांचा म्युन्सिपल कर आकारला जातो. बाजार समितीस शासनाकडून कुठलाही निधी अथवा अनुदान दिले जात नाही. कृषि उत्पन्न बाजार समितीस मिळणाऱ्या मार्केट फीवर महाराष्ट्र शासनास पाच टक्के देखरेख शुल्क व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास बाजार समितीच्या उत्पन्नावर पाच टक्के अंशदान दरवर्षी द्यावे लागते. सरकारच्या खुल्या बाजार धोरणामुळे कृषि उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहे तर दुसरीकडे बाजार समित्याकडून बाजार समितीच्या मिळकतीवर दरवर्षी लाखो रुपयाचा म्युन्सिपल कर आकारला जातो. ही बाब बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत व संचालक मंडळाचे निदर्शनास आल्यानंतर हा ठराव केला आहे.

पुढारी

# सारथी-एनआयपीएचटी संस्थांत सामंजस्य करार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) आणि तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेदरम्यान (एनआयपीएचटी) कृषी क्षेत्राशी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सारथीचे व्यवस्थापकीय संचालक काकडे आणि राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. भास्कर पाटील यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या वेळी सारथीच्या प्रकल्प संचालक रोहिणी भोसले, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे व्यवस्थापक विश्वास जाधव उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या समाजातील व्यक्तींना होणार आहे. सारथीने राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेस या संदर्भात कार्यारंभ आदेश सोमवारी दिला असून सुरुवातीस एकूण १० प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता दिली आहे. फलोत्पादन उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षणाअंतर्गत प्रामुख्याने हरितगृह व्यवस्थापन, शेडनेट हाऊस तंत्रज्ञान, रोपांची अभिवृद्धी व भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन, पीकनिहाय अभ्यासक्रमात गुलाब, जरबेरा, कार्नेशन आणि पीकनिहाय अभ्यासक्रमात रंगीत ढोबळी मिरची, चेरी टोमॅटो, काकडी यांचा समावेश आहे.

**कृषी क्षेत्राशी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रम होणार**

तसेच फलोत्पादन व्यवस्थापन प्रशिक्षणाअंतर्गत लँडस्केपिंग व्यवस्थापन, ऊती संवर्धन तंत्रज्ञान, फ्लॉवर अरेंजमेंट/ड्राय फ्लॉवर आणि प्लॅन्ट पार्ट्सचा समावेश आहे. याशिवाय काढणी पश्चात प्रशिक्षणाअंतर्गत भाजीपाला व फळ पिकांचे काढणी पश्चात व्यवस्थापन, पुरवठा साखळी व्यवस्थापन या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. सामंजस्य करार ३ वर्षाकरिता आहे. प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज करावयाचे असून अर्ज करण्यासाठीची ऑनलाइन सुविधा लवकरच राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेकडून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.



**सामंजस्य करार प्रसंगी अशोक काकडे, डॉ. भास्कर पाटील, रोहिणी भोसले, विश्वास जाधव उपस्थित होते.**

My Pune Edition
Dec 8, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

पुढारी

पुढारी ANCHOR

# थेट पणन परवानाधारकांची तपासणी करा

## सेसबाबतच्या बाजार समिती संघाच्या तक्रारीवर पणन संचालकांच्या सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात थेट पणन परवानाअंतर्गत होणाऱ्या शेतमालाच्या व्यवहारांवरील बाजार फी (सेस) राज्य कृषी पणन मंडळाकडे भरणा केला जात नाही. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याची तक्रार राज्य बाजार समिती सहकारी संघाने पणन संचालकांकडे केली आहे.

त्यावर थेट पणन परवानाधारकांची तपासणी करून सेस भरण्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना पणन संचालकांनी सर्व जिल्हा उपनिबंधकांना दिलेले आहेत.

> थेट पणन परवानांतर्गत जमा करावयाच्या बाजार फीबाबत पणन खाते उदासीन आहे. संबंधित परवानाधारकांनी सेसची रक्कम पणन मंडळात भरली आहे काय, याची तपासणी करण्याची सक्षम यंत्रणाच नाही. त्यामुळे सेस गळती रोखून बाजार समित्यांचे उत्पन्न वाढीसाठी पणन संचालनालयाने राज्यभर ठोस उपाययोजना करून यंत्रणा कार्यान्वित करण्याची आमची मागणी आहे.
>
> \- **प्रवीणकुमार नाहाटा,** सभापती, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ, पुणे.

'पणन संचालनालया'मार्फत थेट पणन परवाना दिल्यानंतर राज्यातील कोणत्याही बाजार समित्यांमध्ये शेतमालाची थेट खरेदी-विक्री करता येते. त्यातून संबंधितांनी कायद्यान्वये होणाऱ्या 'सेस'ची रक्कम ही राज्य कृषी पणन मंडळाकडे जमा करण्याचे बंधन आहे. मात्र, थेट पणन परवान्याअंतर्गत संबंधित सेसची रक्कम मंडळाकडे भरणा करीत नसल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नाहाटा यांनी पणन संचालकांकडे केलेली आहे.

पणन मंडळाकडे रक्कम जमा होण्याचे प्रमाण कमी असल्याने त्यांच्याकडून नंतर त्या-त्या बाजा समित्यांना पाठविण्यात येणारी सेसच रक्कम कमी मिळण्यामुळे समित्यांच्य उत्पन्नावर परिणाम होत आहे. त्यामुळे त्याची माहिती देण्याचीही मागणी त्यांन पत्रांन्वये केली आहे. त्यावर पण संचालकांनी राज्यातील सर्व जिल्ह उपनिबंधकांना जुलै महिन्यात प पाठविले आहे. थेट परवानाधारकांन केलेल्या शेतमाल खरेदीच्या अनुषंगा आवश्यक असणारी बाजार फी महाराष् राज्य कृषी पणन मंडळाकडे जमा केलेल आहे किंवा कसे याबाबतची तपास करून तत्काळ अहवाल साद करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

पुढारी

# थेट पणन परवानाधारकांची तपासणी करण्याच्या सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात थेट पणन परवानाअंतर्गत होणाऱ्या शेतमालाच्या व्यवहारांवरील बाजार फी (सेस) राज्य कृषी पणन मंडळाकडे भरणा केला जात नाही. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याची तक्रार राज्य बाजार समिती सहकारी संघाने पणन संचालकांकडे केली आहे. त्यावर थेट पणन परवानाधारकांची तपासणी करून सेस भरण्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना पणन संचालकांनी सर्व जिल्हा उपनिबंधकांना दिलेले आहेत.

'पणन संचालनालया'मार्फत थेट पणन परवाना दिल्यानंतर राज्यातील कोणत्याही बाजार समित्यांमध्ये शेतमालाची थेट खरेदी-विक्री करता येते. त्यातून संबंधितांनी कायद्यान्वये होणाऱ्या 'सेस'ची रक्कम ही राज्य कृषी पणन मंडळाकडे जमा करण्याचे बंधन आहे. मात्र, थेट पणन परवान्याअंतर्गत संबंधित सेसची रक्कम मंडळाकडे भरणा करीत नसल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नाहाटा यांनी पणन संचालकांकडे केलेली आहे.

पणन मंडळाकडे रक्कम जमा होण्याचे प्रमाण कमी असल्याने त्यांच्याकडून नंतर त्या-त्या बाजार समित्यांना पाठविण्यात येणारी सेसची रक्कम कमी मिळण्यामुळे समित्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. त्यामुळे त्याची माहिती देण्याचीही मागणी त्यांनी पत्रांन्वये केली आहे. त्यावर पणन संचालकांनी राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधकांना जुलै महिन्यात पत्र पाठविले आहे. थेट परवानाधारकांनी केलेल्या शेतमाल खरेदीच्या अनुषंगाने आवश्यक असणारी बाजार फी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाकडे जमा केलेली आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करून तत्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप याची माहिती उपलब्ध झाली नसल्याचे बाजार समिती संघाकडून स्पष्ट करण्यात आले.

> "थेट पणन परवानांतर्गत जमा करावयाच्या बाजार फीबाबत पणन खाते उदासीन आहे. संबंधित परवानाधारकांनी सेसची रक्कम पणन मंडळात भरली आहे काय, याची तपासणी करण्याची सक्षम यंत्रणाच नाही. त्यामुळे सेस गळती रोखून बाजार समित्यांचे उत्पन्न वाढीसाठी पणन संचालनालयाने राज्यभर ठोस उपाययोजना करून यंत्रणा कार्यान्वित करण्याची आमची मागणी आहे."
>
> **- प्रवीणकुमार नाहाटा,**
> सभापती, महाराष्ट्र राज्य
> बाजार समिती सहकारी संघ

Pune Gramin Edition
Dec 5, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

अॅग्रोवन

# पुरंदरमधील ५१२ अंजीर उत्पादकांना 'जीआय' मानांकन प्रमाणपत्र

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : पुरंदर तालुक्यातील अंजिराला आता जीआय मानांकन मिळाले असून, सासवड येथील पांडुरंग भवन येथे प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. एकूण ५१२ शेतकऱ्यांना अंजीर 'जीआय' मानांकनाचे अंजीर पीक प्रशस्तिपत्रक मंजूर करण्यात आले आहे. तर तालुक्यातील ४०० शेतकऱ्यांना प्रशस्तिपत्रक वितरित करण्यात आले.

कृषी विभाग, अखिल महाराष्ट्र अंजीर उत्पादक संशोधन संघ व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य कृषी मंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भौगोलिक मानांकन प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम पार पडला. या वेळी आमदार संजय जगताप, उपविभागीय कृषी अधिकारी, बारामती उपविभागीय कृषी अधिकारी वैभव तांबे, कृषी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. दशरथ ठवाळ, राज्यस्तरीय सल्लागार गोविंद हांडे, अंजीर व सीताफळ संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ युवराज बालगुडे, अंजीर निर्यातदार पुरंदर हायलँड्स शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष रोहन उरसाळ, खोर फूड्स लिमिटेडचे अध्यक्ष समीर डोंबे, तालुका कृषी अधिकारी सूरज जाधव, अप्पासाहेब काळभोर, रामचंद्र खेडेकर, दिलीप जाधव, प्रदीप पोमन तसेच इतर नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

देशभरातील एकूण १२९ भौगोलिक मानांकनामध्ये महाराष्ट्राचा २६ विविध मानांकन रजिस्ट्रेशनमध्ये सर्वात प्रथम क्रमांक लागतो. देशभरातील सासवड, पुरंदरमधील अंजीर हे भौगोलिक मानांकन असल्याची माहिती राज्यस्तरीय सल्लागार पुणेचे गोविंद हांडे यांनी दिली.

## 'जीआय'मुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ब्रँड होणार

भौगोलिक मानांकनामुळे मालास निर्यातीसाठी अधिक संधी उपलब्ध होणार असून, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय बाजारपेठेत ब्रँड होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे पुरंदर अंजिरास जागतिक बाजारपेठेत महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. २०१४ मध्ये पुरंदरच्या अंजिरास जीआय मानांकन मिळाले होते. परंतु २०२२ मध्ये अधिकृतरीत्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

## गोविंद हांडे यांचे मत : पुरंदरमधील चारशे शेतकऱ्यांना नोंदीचे प्रमाणपत्र

# 'जीआय'ने अंजिराला जगाची बाजारपेठ जवळ

सासवड, ता. २ : भौगोलिक मानांकन (Geographil Indication) एक प्रकारची मानांकन नोंद (GI) आहे. जी भौगोलिक क्षेत्राशी निगडित आहे. नैसर्गिकरीत्या व मानवी प्रयत्नातून उत्पादित होणाऱ्या कृषी मालाची ओळख, त्याद्वारे त्याची खास गुणवत्ता, गुणवत्तेतील सातत्य व त्यांच्यामधील विशेष गुणधर्मांचे जतन करण्यासाठी हे मानांकन उपयुक्त आहे. व्यापारी चिन्हाला बाजारपेठेत जे महत्त्व असते, तेच महत्त्व कृषी मालाच्या भौगोलिक मानांकनास असते. म्हणून तर संपूर्ण देशात फक्त पुरंदरच्या अंजिराला जीआयद्वारे जगाची बाजारपेठ जवळ आली आहे, असे प्रतिपादन राज्याच्या कृषी आयुक्तालयाचे तंत्र अधिकारी (निर्यात) गोविंद हांडे यांनी येथे केले.



सासवड (ता. पुरंदर) : पुरंदरमधील शासकीय यंत्रणा, अंजीर उत्पादक संघ व शेतकरी अंजीर कार्यशाळेच्या अंजिराची 'जीआय' नोंदणीची प्रमाणपत्रे शेतकऱ्यांना वितरित करताना मान्यवर.

पुरंदरच्या अंजिराला जीआय मानांकन मिळाल्यानंतर अंजीर उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन तिथे मीटिंग करून महाराष्ट्र स्पर्धाक्षम विकास प्रकल्पामार्फत भौगोलिक चिन्हांकन नोंदणीसाठी ५१२ शेतकऱ्यांचे अर्ज देशाचे केंद्र असलेल्या चेन्नई कार्यालयात दाखल केले होते. त्यापैकी ४०० शेतकऱ्यांची प्रमाणपत्रे प्राप्त झाली. त्याचे वितरण सासवड (ता. पुरंदर) येथे नुकतेच झाले. त्यावेळी हांडे बोलत होते.

अखिल महाराष्ट्र अंजीर उत्पादक संशोधन संघ, राज्यशासनाचा कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी), राज्य कृषी पणन मंडळ आदींच्या संयुक्त विद्यमाने सासवडला पांडुरंग भवनात अंजीर उत्पादक शेतकऱ्यांची कार्यशाळा झाली. त्याच्या दुसऱ्या सत्रात आमदार संजय जगताप, गणेशखिंडचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विनय सुपे, विभागीय कृषी अधिकारी विभव तांबे आदींच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

पारगोडी अंजीर सीताफळ संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. प्रदीप दळवे, डॉ. युवराज बालगुडे, डॉ. गणपत इदाते, पणनचे विभागीय प्रकल्प अधिकारी अजय कुदळे, सुनील गिरमे, तालुका कृषी अधिकारी सूरज जाधव, अंजीर संघाचे अध्यक्ष अप्पासाहेब काळभोर, उपाध्यक्ष रामचंद्र खेडेकर, सचिव दिलीप जाधव, खजिनदार प्रदीप पोमण, संचालक डॉ. दशरथ ढवळे, रोहन उरसळ, समीर डोंबे, दीपक जगताप आदी मान्यवर व शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक अप्पासाहेब काळभोर यांनी केले. सूत्रसंचालन अंजीर संघाचे व्यवस्थापक मारुती बोरावके यांनी केले.

### मानांकन नोंदणीचे फायदे...

- भौगोलिक क्षेत्राशी निगडित मालास संरक्षण प्राप्त होते.
- अनधिकृत वापर करणाऱ्यांस रोखता येते.
- निर्यातीसाठी अधिक संधी.
- नोंदणीकृत कृषी मालास ब्रँड होण्यास मदत
- प्रमाणपत्रधारक उत्पादकास जास्तीचे आर्थिक उत्पन्न
- सुविधा : प्रशस्त वाहन पार्किंग

> आजोबांच्या किंवा वडिलांच्या काळात असलेली शेतजमीन आणि आताची शेतजमीन यात खूप फरक पडला. आम्ही काही मातीचे नमुने तपासले. तर काही माती नमुन्यांचे अहवाल मृत आले. म्हणजेच जमिनीत सूक्ष्मजीवांचे प्रमाणच आढळले नाही. त्यामुळे जमिनीचा कस आणि पिकाचे आरोग्य याकर लक्ष द्यावे लागेल. तरच तुम्ही सेंद्रिय शेती किंवा जीआय नोंदणीकृतपर्यंत पोहचू शकता.
>
> -डॉ. विनय सुपे, सहयोगी संशोधन संचालक, पुणे